*"Knowledge Scholar"*
*An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research*
*Volume: 02, Issue: 06, Nov.-Dec. 2015* *eISSN NO. 2394-5362*
*Impact Factor (IIFS) - 0.776*

# आधुनिक ग्रंथालयामध्ये ई-बुक ची आवश्यकता

**मदन दत्तराव झाडे**
संशोधक विद्यार्थी
डॉ.बा.आ.म.वि.औरंगाबाद

**डॉ. सिद्दीकी एराज अजीजा**
ग्रंथपाल
डॉ. रफिक झकेरीया कॉलेज
फॉर वूमन, औरंगाबाद.

**सार :**

डिजिटल तसेच प्रकाशिय माध्यमांच्या विकासामुळे छापील माध्यमांबरोबरच ई-स्वरुपात साहित्य प्रकाशित होण्यास सुरुवात झाली छापील माध्यमांच्या तुलनेत ई-स्वरुपातील साहित्य वाचकांची संख्या हळुहळु वाढत आहे. त्यामुळे ई-स्वरुप वाचन साहित्य प्रकाशित करण्याकडे लक्ष देणे आज काळाची गरज आहे व त्याचे फायदेही आहेत. ग्रंथ विकासाच्या प्रक्रियेत ई-बुक्स या अमुद्रीत साधनाचा समावेश आधुनिक ग्रंथालयात करणे गरजेचे आहे.

**प्रस्तावना :**

आजच्या आधुनिक ग्रंथालयामध्ये ई-बुक्स हे महत्वाचा घटक म्हणून उदयास येत आहे. बहुतेक ग्रंथालये कॅन्सॉरशिआ व इतर संकेतस्थळांच्या माध्यमातून ही सेवा प्रदान करत आहेत. देश-विदेशातील ग्रंथालये व माहितीशास्त्रातील विद्वान मंडळी हे ई-बुक्सना मुद्रीत स्वरुपाच्या कुठल्याही प्रलेखास पूर्ण पर्याय म्हणून बघतात. अशा प्रकारची मते मुद्रीत व अमुद्रीत माहितीची साधने यांचा सर्वांगीण अभ्यास केल्याविना अतिशयोक्तीपुर्ण

वाटतात. अशा प्रकारचा एकांगी दृष्टीकोन ग्रंथपालन व्यवसायासाठीच नव्हे तर एकूण उपभोक्त्यांसाठी देखील हानिकारक आहे. परंतु आजच्या युगामध्ये मात्र ई-बुक्स उच्च शिक्षण क्षेत्रात अविभाज्य व अंगभूत घटक असायला हवा. त्याकडे केवळ मुद्रीत साहित्याला पर्याय म्हणून पाहणे हा फार संकुचीत दृष्टीकोन ठरेल.

खरे पाहता ई-बुक्स हे मुद्रीत साहित्यासमवेत परिस्थितीसापेक्ष वापरावयाचे आहे. परिस्थिती, वेळ आणि उपयुक्तता ह्या तीन गोष्टी कुठल्या वेळेस कोणते साधन योग्य आहे हे ठरविण्याचे कार्य करत असते.

## ई-बुक्स म्हणजे काय? :

इंटरनेटची लोकप्रियता व माहिती तंत्रज्ञानाची सर्व व्यापकता यामुळे प्रकाशन व्यवसायातील लोकांना वेब प्रकाशन आणि इलेक्ट्रॉनिक प्रकाशन यांविषयी विचार करणे आवश्यक आहे. इलेक्ट्रॉनिक बुक ज्याला संक्षिप्त स्वरुपात 'ई-बुक' असे म्हटले जाते हे एक महत्वाचे डिजीटल रिसोर्स आहे. त्याचा वापर करणे म्हणजे पारंपारीक अशा मुद्रीत साधनांबरोबरच इलेक्ट्रॉनिक्स मिडीयाकडे वळणे होय. परंतु याचाच अर्थ ई-बुक म्हणजे पारंपारिक ग्रंथांना पूर्ण तिलांजली देणे असा नाही. जरी काही अंशी हे शक्य असू शकेल.

ई-बुक हे पारंपारिक ग्रंथाचे अमुद्रीत रुप (Electronic Version) होय. संगणकाच्या किंवा ई-बुक रिडरच्या माध्यमातून या नविन स्वरुपाच्या ग्रंथाचे वाचन किंवा आकलन करता येते.

**व्याख्या : -**

अलेन केन्ट यांच्या मते, '' इलेक्ट्रॉनिक बुक म्हणजे असा ग्रंथ की जो मुद्रीत ग्रंथासारखा नेहमीप्रमाणेच असतो; परंतु त्याचे प्रकटीकरण संगणकाच्या पडद्यावर अमुद्रीत स्वरुपात होते.'' (बापते, वि.द., ज्ञानगंगोत्री-जून-नोव्हेंबर २०१२)

*"Knowledge Scholar"*
*An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research*
*Volume: 02, Issue: 06, Nov.-Dec. 2015* *eISSN NO. 2394-5362*
*Impact Factor (IIFS) - 0.776*

## आधुनिक ग्रंथालयामध्ये ई-बुकची आवश्यकता व महत्व :-

ई-बुक ला आधुनिक ग्रंथालयांमध्ये हळुहळु महत्व प्राप्त होत आहे. ई-बुक्स सामान्य पुस्तकाचे इलेक्ट्रॉनिक स्वरुप ते वाचकांना डिजिटल स्वरुपात सी.डी.वर किंवा ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध होते. ई-बुक्स वापरण्यासाठी संगणकाशिवाय इतर अनेक इलेक्ट्रॉनिक साधने आज उपलब्ध आहेत. ई-बुक्स प्रकाशनासह उपयुक्त अशी मानके आज उपलब्ध असल्यामुळे त्यांना आजच्या ग्रंथालयांना त्याचा पुरेपूर उपयोग घेता येतो.

Open e-book standard हे त्यातील एक होय. ई-बुक्स ही विविध स्वरुपात प्रकाशित होतात. उदा. ॲडोबचे पी.डी.एफ (PDF) फॉरमॅट तसेच इंटरनेटवर ऑनलाईन स्वरुपात प्रकाशित होणारी ई-बुक्स जे XML/SGML सारख्या वेब फॉरमॅटमध्येही प्रकाशित होतात.

सध्या वाचक प्रथदर्शनी जरी ई-स्वरुपातील साहित्य टाळत असले तरीही वाचकांना ई-स्वरुपातील ग्रंथ विकत घेण्याचे फायदे आहेत. हे ते जाणतात. खर पाहता ई-बुक्स प्रकाशनास भविष्यात चांगल्या संधी तसेच खुप वाव आहे. पुस्तके विकत घेऊन घरी कपाटात साठवून ठेवण्यापेक्षा तरुण वाचक अनेक ई-बुक्स त्याच्या ई-बुक रिडरमध्ये साठवून हवे तेव्हा व हवे तेथे किंवा प्रवासात वाचणे पसंत करतात.

सध्या हॅन्डलेल्ड रिडरची किंमत पन्नास डॉलर्स आहे. भविष्यात ती कमी होईल. अशी प्रगत उपकरणे जेव्हा आणखी कमी किंमतीत उपलब्ध होतील तेव्हा ई-बुक्स विनासायास वापरली जातील. परंतु सध्या यासाठी थोडी वाट पाहावी लागणार. ई-बुक्स खरे तर वापरण्यास सोपी असतात. सामान्य पुस्तकाप्रमाणे ती दिसतात. शिर्षक पान, अनुक्रमणिका, प्रकरणे व शेवटी निर्देश यादी या सर्व गोष्टींकडे आपणास लगेच जाता येते त्यासाठी आयकॉन दाखविले जातात. नेमक्या पानाकडे तात्काळ आपण पोहचवू शकतो. पान पुढे पुढे पाहणे तसेच

पाठीमागे जाणे शक्य होते. इतकेच काय आपण पुस्तकाची पानी अशी बोटाने उलटतो त्याप्रमाणे आभासी अनुभवही घेता येतो. ग्रंथातील काही भाग किंवा प्रकरणे आपण डाऊनलोड करु शकतो.

ई-बुक पूर्णत: डिजिटल स्वरुपात असते. असे असले तरी एखादी संज्ञा किंवा शब्द ज्या पानात असेल त्या पानाकडे नेमके जाता येते. काही लेखक ई-बुक्स नि:शुल्कपणे ई-स्वरुपात प्रकाशित करतात. इंटरनेटवर ई-बुक्स ऑनलाईन स्वरुपात उपलब्ध केली जातात. व्यावसायिक पध्दतीने प्रकाशक ई-बुक्स प्रकाशित करुन वाचकांना किंवा ग्रंथालयांना वर्गणी भरुन विकतात. ई-जर्नलप्रमाणे त्याच्या उपलब्धतेनुसार त्यांची किंमत ठरते. अशा पध्दतीने आधुनिक ग्रंथालयांमध्ये ई-बुक महत्वाचे आहे. (फडके द.ना. 2012).

## समारोप :-

पाश्चात्य देशात ई-ग्रंथांना लोकप्रियता आणि महत्व मिळत आहे. भारतातही काही ग्रंथालयांमध्ये ही सुविधा दिली जाते. आज अनेकदा शिक्षकांकडून आमच्या विषयावर ई-बुक्स उपलबध आहेत का अशी विचारणा आजच्या ग्रंथपालांना होत आहे. ग्रंथपाल म्हणून कार्य करणाऱ्या व्यावसायिकांना हा प्रश्न नक्कीच प्रेरणादायी ठरु शकतो.

## संदर्भ : -

१) फडके, द.ना. (2012), ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण, पुणे, युनिव्हर्सल प्रकाशन.

२) बापते, विशाल (2012), ई-बुक : शैक्षणिक ग्रंथालयातील एक गरज, ज्ञानगंगोत्री: नाशिक.

३) www.iso.inflibnet.ac.in

४) www.hongkiat.com

५) http://ebook-reader.rew.toptenrevieviews.com